साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
वर्ष 31 वे
| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com
| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख
संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०
नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक १३६ | पाने-१२ | दि.४/८/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम
स्टिल अँड सिमेंट एजन्सी
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रेशसॅण्ड योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# महसुल सप्ताह संपन्न - विविध योजनांची अंमलबजावणी - शेतकऱ्यांचे कर्जबोजे केले कमी

महसूल विभाग

करमाळा : शासनाच्या सुचनेनुसार करमाळा तालुक्यात महसुल सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात विविध कार्यक्रमाबरोबरच प्रबोधन व जनजागरणाचे कार्यक्रम करण्यात आले. या महसुल सप्ताहाचा प्रारंभ १ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आला. त्यानुसार तालुक्यातील सर्व मंडल अधिकारी व तलाठी कार्यालयात विशेष कार्यक्रम करण्यात आले. या सप्ताहात पुर्नवसन गावठाणात स्मशानभुमी, दफनभुमी उभारणीबाबत निर्णय घेण्यात आले. गावागावातील अवकाळी पावसाने जे पशूधन मरण पावले त्यांना अनुदान दिले तसेच संजय गांधी निराधार योजने अंतर्गत पात्र व्यक्तीची प्रकरणे मंजूर केली, त्याची पत्रे दिली. या निमित्ताने कर्मचारी व त्यांचे कुंटुबीय यांची आरोग्य तपासणी केली. तसेच कर्मचाऱ्यांचे व माजी सैनिकांचे विशेष सत्कार केले. यात साडे व वरकुटे येथे ५ ऑगस्टला शहीद व माजी सैनिक पत्नीचे मेळावे घेऊन त्यांच्या समस्या समजून घेतल्या आहेत.



या महसुल सप्ताहामध्ये भुविकास बँकेचे जे कर्जदार होते व त्यांनी कर्ज फेड केले आहे. अशा १४१ खातेदारांचे ७/१२ उताऱ्यावरील बँक कर्ज बोजे कमी केले आहेत. या विभागाचे प्रांताधिकारी समाधान इटुकडे यांनी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थांना स्पर्धा परिक्षेचे मार्गदर्शन केले आहे. याशिवाय मतदार नोंदणी व मतदार जागृती कार्यक्रम घेतले. एवढेच नाहीतर विद्यार्थांचे आधार कार्ड अपडेट करण्याची कामे जवळपास पुर्ण झाली आहेत. जे अधिकारी उत्कृष्ट काम करतात त्यांचे सन्मानही या कालवधीत पुर्ण केले आहेत.

...विजय जाधव(प्रभारी तहसीलदार, करमाळा)

धर्मसंगीत
लॉन्स मंगल कार्यालय
सर्व सुविधायुक्त असे मंगल कार्यालय
करमाळा शहरात नव्याने सुरू
बुकींग सुरू आहे





आपल्या करमाळा तालुक्यातील सर्वात
भव्य लॉन्स मंगल कार्यालय
करमाळा शहरापासून १ कि.मी. अंतरावर
नागनाथ मंदिराजवळ, करमाळा-कर्जत रोडवर
सर्व सोयीसुविधायुक्त प्रशस्त लॉन्स, लग्न हॉल, जेवण हॉल
किचन, प्रशस्त पार्किंग असे
धर्मसंगीत लॉन्स मंगल कार्यालय सुरू होत आहे.
टीप : पॅकेज व्यवस्था देखील उपलब्ध असणार आहे.
उपलब्ध सुविधा
- एक हजार खुर्च्या, शंभर टेबल (लोखंडी)
- सहा रूम वधू-वर सह
- स्वयंपाक व जेवणाची भांडी
- ३५ केव्ही जनरेटर व साऊंड सिस्टीम
- वाय-फाय सुविधा, सर्वत्र सीसीटीव्ही निगराणी
- मंगल कार्यालयाचे लॉन्स एन्ट्रीला भव्य रोमन थीम डेकोरेशन सेट संपूर्ण लाईटींगसह
संपर्क : आबासाहेब आवटे परिवार (8888832011 / 9822600663 )

कामात सातत्य, नागरीकांशी नम्रता व वाढत्या सुविधा दिल्या की राजकारणात यश हमखास !

## संपादकीय.........................................!

# अनुकरणीय राजकारणी !

राजकारणात यश अपयश हे कायम असते पण एखादी व्यक्ती सलग एकाच मतदार संघात सहा वेळा निवडूण येणे एवढेच नव्हेतर आपल्या मतदार संघातील मतदारावर असलेल्या प्रभावाच्या जोरावर आपल्या बंधुला निवडूण आणणे ही सोपी बाब नाही. तरीही ते शिंदे बंधु यांनी आपल्या कार्यकुशलतेवर शक्य केले आहे.

माढा लोकसभा मतदार संघ ज्या पध्दतीनं २००८ ला निर्माण झाला, त्याच पध्दतीनं माढा विधानसभा मतदार संघात २००८ ला बदल होऊन नवीन मतदार संघ निर्माण करण्यात आला. २४५ माढा विधानसभा मतदार संघात माढा तालुक्यातील टेंभूर्णी, मोडनिंब, माढा, दारफळ, चिंचोली ही महसुल मंडळे तसेच पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरोली, करकंब आणि तुंगत ही महसुल मंडळे आणि माळशिरस तालुक्यातील महाळुंग हा महसुल मंडळ याचा मिळून हा मतदार संघ झालेला आहे. आपल्या तालुक्यासह अन्य दोन तालुक्यातील मतदार संघाशी संपर्क ठेवून यश मिळवणे सोपे नव्हते पण ते आमदार बबनदादा शिंदे यांनी शक्य तर केले पण दरवेळी जादा मताधिक्य मिळवण्याचा विक्रमही त्यांनी केला आहे. म्हणजे करमाळ्यात फक्त माढ्यातील दोन मंडळे तर माढा मतदार संघात माळशीरस व पंढरपूर तालुक्यातील चार मंडळे आहेत.आणखी विशेष म्हणजे मोहिते-पाटील यांच्या सारखे मात्तबर विरोधकाच्या तालुक्यातील एक मंडळ असतानाही श्री. शिंदे सहज व जोमात विजयी होतात ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

खरंतर माढा विधानसभेचा इतिहास पहाता त्यामध्ये १९६२ पासून १९९५ पर्यंत माजी आमदार पांडुरंग पाटील हे फक्त दोनदा विजयी झाले. नाहीतर एकदा निवडूण आलेला आमदार पुन्हा निवडूण आला नाही. पण आमदार बबनदादा शिंदे यांनी सर्व रेकॉर्ड ब्रेक करत या मतदार संघातून सलग सहावेळा आमदकी हासील केली आहे. यामतदार संघचा इतिहास पहाता माढा मतदार संघाची निर्मिती १९५७ ला झाली. त्यानंतर १९६२ ला माढा विधानसभा मतदार संघाची पहिली सार्वत्रीक निवडणूक झाली. त्यावेळी हा मतदार संघ राखीव होता. त्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसचे प्रतिनिधी काशिनाथ बाबा अवसरे हे विजयी झाले. त्यांना १६६५९ मते मिळाली होती. त्यांनी रिपब्लीकन पार्टीचे केरूआप्पा लंकेश्वर ८६८१ मताने पराभव केला होता. लंकेश्वर यांना ८८७८ मते मिळाली होती. १९६७ साली हा मतदार संघ सर्वसाधारण झाला. त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने एस.एम.पाटील (तात्या) हे निवडून आले. त्यांना २८९४८ मते पडली तर राष्ट्रीय काँग्रेसचे के.के.परबत यांना २२६३४ मते मिळाली. श्री. पाटील हे ६३१४ मताने विजयी झाले. त्यानंतर १९७२ साली राष्ट्रीय काँग्रेस मार्फत विठ्ठलराव शिंदे यांना उमेदवारी मिळाली, त्यावेळी ते १२७९९ मतांनी विजयी झाले होते. त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे एस.एम.पाटील यांचा पराभव केला. त्यावेळी शिंदे यांना २९२३३ मते मिळाली तर श्री.पाटील यांना १६४३७ मते मिळाली. १९७८ ला कृष्णराव कोडींबा परबत हे अपक्ष उभे राहिले. त्यांना २५०७६ तर शेतकरी कामगार पक्षाचे एस.एम.पाटील यांना २२३०८ मते मिळाली. त्यावेळी श्री.परबत हे २७६८ मताने विजयी झाले. १९८० ला पुन्हा एकदा निवडणूक झाली. त्यात धनाजी गणपतराव साठे हे इंदिरा काँग्रेसकडून विजयी झाले. त्यांना २९६९८ मते मिळाली. त्यांचे विरूध्द डॉ.कुंतीलाल शहा हे अपक्ष उभे होते, त्यांना १८७०७ मते मिळाली. १९८५ साली पांडूरंग पाटील हे अपक्ष उभे होते तर राष्ट्रीय काँग्रेसकडून प्रकाश मस्के हे उभे होते. पाटील यांना ३८७६० मते तर मस्के यांना २९८९० मते मिळाली. त्यात श्री.पाटील हे ८८७० मताने विजयी झाले. १९९० ला पांडूरंग पाटील यांना राष्ट्रीय काँग्रेसने तिकीट दिले. त्यांना ३८७६० मते मिळाली तर त्यांचे विरूध्द अपक्ष माजी आमदार धनाजी साठे हे उभे होते. त्यांना २२५२५ मते मिळाली. श्री. पाटील हे १६२३५ मताने विजयी झाले. सन १९९५ ला बबनराव विठ्ठलराव शिंदे हे अपक्ष उभे राहिले त्यांना ४८८९६ मते मिळाली तर तत्कालीन आमदार पांडूरंग पाटील हे काँग्रेसकडून उभे होते. त्यांना २८५८६ मते मिळाली. शिंदे हे २०११० मतांनी विजयी झाले. त्यानंतर आमदार बबनराव शिंदे हे १९९९, २००४, २००९, २०१४ व २०१९ या निवडणुकात सलग विजयी झाले आहेत. त्यांना १९९९ ला ५९९९७, २००४ ला ९२८५१, २००९ ला १,१०,२२४ तर २०१४ ला ९७८०३ तर २०१९ ला त्यांनी ६७ हजाराचे मताधिक्य घेऊन शिवसेनेचे संजय कोकाटे यांचा पराभव केला आहे. सन १९९५ पासून बबनदादा शिंदे हे वेगवेगळ्या उमेदवाराशी लढत देऊन प्रत्येक वेळी मतदान व मताधिक्य मिळवत त्यांनी विधानसभेत यश मिळवले आहे.

विशेष म्हणजे करमाळा मतदार संघाची माढ्या प्रमाणेच मतदार संघाची निर्मिती सन २००८ साली झाली. त्यावेळी करमाळा तालुका व माढा तालुक्यातील रोपळे व कुर्डूवाडी ही दोन मंडळे मिळून हा मतदारसंघ बनवला. माढा मतदार संघात बाहेरील दोन तालुक्यातील चार जिल्हा परिषद मतदारसंघ आहेत पण श्री. शिंदे तिथे सहज निवडूण येतात पण करमाळा तालुक्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींना मात्र आपली सत्ता टिकवता आली नाही. उलट शिंदे बंधुतील संजयमामा शिंदे हे करमाळा मतदार संघातून विजयी झाले आहेत.आमदार संजयमामा शिंदे यांचे परिश्रम, कल्पकता ही जेवढी महत्वाची आहे. त्याबरोबरच आमदार बबनदादा शिंदे यांचे नियोजनही महत्वाचे ठरलेले आहे.त्याचे कारण म्हणजे त्यांनी माढा तालुक्यातील मतदाराशी जोडलेले नाते व त्यातून केलेली पायाभरणी महत्वाची ठरली आहे.यात आमदार बबनदादा शिंदे यांचा विचार करता पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरोली, करकंब, तुंगत या तीन जिल्हा परिषद गटातील मतदान व माळशिरस तालुक्यातील महाळुंग जि.प. गटातील मतदान म्हणजेच चार जिल्हा परिषद गटातील बाहेरील मतदान असूनही शिंदे यांनी मिळवलेले यश हे निश्चितच विचार करावयास भाग पाडणारे आहे. किंबहूना जिल्ह्यातील सर्वच राजकर्त्यांना शिंदे बंधूचा राजकीय आदर्श घेऊन राजकारण करण्यासारखा एक नवा पायंडा दिसून येतो. सलग ३० वर्षे मतदार संघावर स्वत:चे वर्चस्व टिकवणं ही बाब सोपी नाही. मॅट्रीक पर्यंत शिक्षण झालेले आ.बबनदादा शिंदे हे सुरूवातीला १९७२ ते १९८५ या कालावधीत निमगाव (टे) चे सरपंच होते. पुढे १९७९ ते १९८५ पंचायत समितीचे सदस्य ., १९८५ ते १९९० पंचायत समितीचे सभापती, १९९२ ते १९९५ जिल्हा परिषदेत पक्षनेता अशी कामे करत ते जिल्ह्यात पोहचले. त्यांनी १९८५ ते १९९९ पर्यंत व २०१० ते २०१४ पर्यंत जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक, १९९० ते १९९७ जिल्हा दूधसंघाचे चेअरमन, १९९० ते १९९७ राज्य दूध महासंघाचे संचालक, १९९८ पासून माढेश्वरी अर्बन बँकेचे चेअरमन, १९९९ ला विठ्ठलराव शिंदे सह.साखर कारखाना स्थापन करून त्याचे चेअरमन म्हणून काम पाहत आहेत. या कारखान्याने राज्य व देशपातळीवरील अनेक पुरस्कार पटकविले आहेत. यावर्षी देशात सर्वाधिक गाळप करणारा हा कारखाना ठरलेला आहे. माढा तालुक्यातील बाजार समिती, पंचायत समिती, खरेदी-विक्री संघ, अशा विविध संस्था शिंदे बंधु यांच्याकडेच आहेत.

आमदार बबनदादा शिंदे यांनी त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी भीमा-सीना नदी जोड प्रकल्प पूर्ण करून २० किमी अंतराचा ४०० फुट खोलीचा बोगदा पूर्ण करून ११ हजार ८०० हे. जमीन ओलिताखाली आणली आहे. तसेच सीन-माढा उपसासिंचन योजनाही पूर्ण करून आपल्या भागातील शेतीला पाणी मिळवलेले आहे. शिंदे बंधू यांनी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना, गंगामाई पिंपळनेर याबरोबरच या नावाचे नव्याने विकत घेतलेले करकंब येथील दुसरे युनीट, केवाड येथील साखर कारखाना, करमाळा येथील कमलाभवानी शुगर्स,तसेच म्हैसगाव येथील विठ्ठल शुगर्स, इंडीचे शुगुर फॅक्टरी युनीट (सध्या त्याची चर्चा बंद आहे.) म्हैसगाव येथील सुत गिरणी , याशिवाय स्वत:चे शेती फार्म जे विकसीत केले ते सुध्दा महत्वाचे आहे.

श्री.शिंदे यांचे कौतुकासाठी हा अग्रलेख नाही परंतू राजकारणात राहून कार्यकर्ते जोडून ठेवणे, सहकारी व व्यक्तीगत व्यवसायीक संघ उभारून त्याची प्रगती करणे, राज्यपातळीवर संपर्क ठेवून विकासाचे प्रकल्प खेचून आणणे, स्वत:चे अर्थाजनाची साधने मजबूत करणे, शेतीची प्रगती करणे, याबरोबरच विरोधकाबरोबर संपर्क ठेवूनही आपली प्रगती करता येते, ईडीसारखा फेरा आल्यानंतरही न घाबरता सन्मानाने रहाता येते हे शिंदे बंधूंनी दाखवले. ही बाब अधोरेखीत करण्यासाठी हा अग्रलेख आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# ७ ऑगस्टला बांधकाम कामगार नोंदणी मेळावा



करमाळा(सं.प्र.) : श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने ७ ऑगस्टला भाजपा संपर्क कार्यालय येथे सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या कालावधीत बांधकाम कामगार नोंदणी मेळावा आयोजित करण्यात आला आहे; अशी माहिती भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांनी दिली.

नावनोंदणी करण्यासाठी बांधकाम कामगारांनी आधारकार्ड, रेशनकार्ड, आयडेंटी फोटो, ९० दिवस काम केल्याचा पुरावा, काम करतानाचा फोटो, रहिवासी पुरावा, बँक पासबुक आदी कागदपत्रे आणणे आवश्यक आहे. अधिकृत नोंदणी झालेल्या बांधकाम कामगारांना विवाहासाठी ३० हजार रू. अनुदान, मोफत मध्यान्ह भोजन सुविधा, बांधकाम कामगारास आवश्यक असणारे खरेदीसाठी ५ हजार रू. अनुदान, कुटूंबियांना गंभीर आजारासाठी १ लाख रू. वैद्यकिय मदत, घर बांधणीसाठी ४.५ लाख रू मदत तसेच कामगाराच्या वारसास प्रतिवर्षी २४ हजार रू. आर्थिक सहाय्य, संसारपयोगी वस्तुंची पेटी व मुलांना शिष्यवृत्ती आदीचा लाभ होणार आहे. तरी बांधकाम कामगारांनी जास्तीत जास्त संख्येने या मेळाव्यात उपस्थित राहून आपली नोंदणी करून घ्यावी; असे आवाहन श्री.चिवटे यांनी केले आहे.

# शिवसहकार सेनेच्या ता.प्रमुख पदी नवनाथ गुंड



करमाळा(सं.प्र.) : शिवसेना पुरस्कृत शिवसहकार सेनेच्या करमाळा तालुका प्रमुख पदी शेटफळ येथील नवनाथ रामदास गुंड यांची निवड करण्यात आली आहे. शिवसहकार सेनेचे अध्यक्ष व माजी खासदार आनंदराव अडसुळ यांचे मार्गदर्शनाखाली ३ ऑगस्ट रोजी विविध कार्यकर्त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. त्यामध्ये शिवसहकार सेनेच्या करमाळा तालुका प्रमुख पदी गुंड यांची निवड करण्यात आली आहे. करमाळा तालुका समन्वयक पदी पांडूरंग लोखंडे, तालुका सचिव पदी विठ्ठल मासाळ यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र माजी खासदार अडसुळ, माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री ॲड.अनंत सकुंडे, कार्याध्यक्ष शिवाजी पाटील, राज्य सचिव आनंद यादव, राज्य उपाध्यक्ष नागेश होनकळसे, आशाताई मामेडी व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी भाऊसाहेब आंधळकर, प.महाराष्ट्र विभागीय सचिव सुरज काळे यांचे उपस्थितीत देण्यात आले. गुंड, लोखंडे व मासाळ यांचे निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# संगोबा ते घारगाव रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य



करमाळा(सं.प्र.) : संगोबा ते घारगाव रस्त्याची दुरावस्था झाली असून, रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे जाळे पसरले आहे. त्या खड्ड्यामध्ये पावसाचे पाणी साचत असल्यामुळे वाहन चालकांना त्याचा अंदाज येत नाही. रस्त्यावर प्रवास करताना नागरीकांना व शालेय विद्यार्थ्यांना तारेवरची कसरत करावी लागते. या रस्त्यावरून वाहनांची ये-जा मोठ्या प्रमाणात असल्याने सदरचा रस्ता निसरडा झाला आहे. त्यामुळे दोन चाकी वाहने घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सदरचा रस्ता मराठवाड्यातील परांडा, भूम, धराशिवला जोडणारा आहे. सदर रस्त्यावर मराठवाड्यात जाणाऱ्या वाहनांची बऱ्यापैकी ये-जा होत असते. तरी प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन संगोबा ते घारगाव रस्त्यावरील खड्डे बुजवावेत; अशी मागणी घारगावच्या सरपंच लक्ष्मी संजय सरवदे यांनी केली आहे.


ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AIIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ / २४ तास अत्यावश्यक सेवा
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार Nutritionist & Dietitian आहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन • सुवर्णप्राशन संस्कार (दर महिन्यातील पुष्य नक्षत्रास)
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा) Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत) PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test (गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : केकीज केक शॉपच्या वरच्या मजल्यावर, सुभाष चौक, मेनरोड, करमाळा.
• संपर्क : 9960334005, 9423333950


# ग्रामीण भागातील रस्त्यांची चाळण - तात्काळ दुरूस्तीचे कामे हाती घ्या !

## अन्यथा खड्ड्यात वृक्षारोपण करून आंदोलन करणार : सतीश नीळ

करमाळा (सं.प्र.): करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रमुख रस्त्यांची दुरावस्था झाली असून अनेक गावांचा तालुक्याला जोडणारा डांबरी रस्ताच राहिला नाही. रस्त्यावरील डांबर निघून गेले असून अनेक ठिकाणी फक्त मातीचे रस्ते व गुडघ्याएवढे खड्डे झाले आहेत. सध्या पावसाळा सुरू असल्याने खड्ड्यात पाणी साचून राहिल्याने वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज न आल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. खड्डेमय रस्त्यामुळे नागरीकांना प्रवास करताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बांधकाम विभागाने याची दखल घेऊन तात्काळ रस्ता दुरूस्तीची कामे हाती घ्यावीत. अन्यथा संपूर्ण तालुक्यातील रस्त्यावरील खड्ड्यात वृक्षारोपण करून आंदोलन करण्यात येईल; असा इशारा मकाई कारखान्याचे संचालक सतीश नीळ यांनी दिला आहे. याबाबत श्री.नीळ यांनी म्हटले आहे, की करमाळा तालुक्यातील पोमलवाडी ते केत्तूर, सावडी फाटा ते केत्तूर, वाशिंबे चौफुला ते राजुरी, दिवेगव्हाण ते कुंभारगाव, पूर्व सोगाव ते उमरड, कुगाव ते चिखलठाण, शेटफळ., वाशिंबे ते सोगाव, राजुरी, पोंधवडी., फिसरे ते हिवरे, कोळगाव, गौंडरे., नेरले ते साडे, सौंदे (गुळसडी मार्गे) ते करमाळा व बिटरगाव श्री ते तरटगाव पर्यंत या सर्व रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. रस्त्यावरून प्रवास करताना शेतकरी, नागरीक, शालेय विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. तसेच अपघातालाही निमंत्रण मिळत आहे. त्यात संततधार पावसामुळे रस्त्याच्या दुरावस्थेत वाढ झाली आहे. तरी बांधकाम विभागाने रस्त्यावरील खड्डे त्वरीत बुजवून नवीन रस्ते बनविण्याची मागणी नागरीकांमधून केली जात आहे; असेही नीळ यांनी सांगितले.


इमारत विकणे आहे
मथुरानगर मधील ८५०० स्के.फुट बांधकाम असलेली इमारत त्वरीत विकणे आहे
संपर्क : मो.9423237685, 9850925213



प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्याचा दवाखाना
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
उपलब्ध सुविधा..
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदूवरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर
• जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
• नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
पत्ता
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जट बनवून मिळतील)
पत्ता : बसस्थानक शेजारी, बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा.(9527268181 / 9860872619)



श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# २ ऑगस्ट पासून ओव्हर फ्लोचे पाणी पोंधवडी चारीवरून सुरू



करमाळा(सं.प्र.) : जवळपास २५ वर्षापूर्वी कुकडी प्रकल्पाचे पाणी करमाळा तालुक्यात आले. परंतु पोंधवडी चारीचे काम अपूर्ण असल्यामुळे तालुक्यातील अनेक गावे कुकडीच्या पाण्यापासून वंचित होती. कुकडी प्रकल्प डावा कालवा अंतर्गत पोंधवडी चारीचे काम निधीअभावी २००९ पासून रखडलेले होते. सदर चारीच्या कामासाठी निधी मिळावा म्हणून विहाळ, कोर्टी, गोरेवाडी, हुलगेवाडी, कुस्करवाडी, राजुरी, वीट, अंजनडोह या गावातील नागरीक सातत्याने लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करत होते. कॅनॉलचे कामे रखडल्यामुळे कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांमध्ये कुकडीचे पाणी दाखल झालेले नव्हते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आमदार संजयमामा शिंदे यांनी कुकडी प्रकल्प अंतर्गत येणारी पोंधवडी चारीचे काम पूर्ण करून या चारीवरील गावांना आपण पाणी देऊ असे वचन दिले होते. या वचनाची पूर्ती २०२३ मध्ये आ.शिंदे यांच्याकडून झाली. पोंधवडी चारीसाठी ९ कोटीचा भरीव निधी प्राप्त झाल्यामुळे या चारीवरील सर्व कामे पूर्ण होऊन प्रत्यक्षात २ ऑगस्ट पासून ओव्हर फ्लोचे पाणी पोंधवडी चारीवरून सुरू झाले आहे.

कुस्करवाडी चारीवर आखाडे वस्ती नजीक महिलांनी कुकडीच्या पाण्याचे पूजन केले. याप्रसंगी संगीता आखाडे, शालन आखाडे, तनुजा पाटील, सविता आखाडे, काशिनाथ आखाडे, कल्याणी आखाडे, राजू आखाडे, रेवणनाथ आगलावे, भाऊसाहेब आखाडे आदी उपस्थित होते.

त्रिंबक पाटील वस्तीवरील शेतकऱ्यांनीही पाणी पूजन केले. याप्रसंगी मधुकर गावडे, दादा गावडे, मोहन शिरसकर, सलीम शेख, शिवाजी पाटील, शाहरूख पठाण, रवि आखाडे उपस्थित होते. हवालदार वस्ती, दिवटेवाडी येथेही महिलांच्या हस्ते पाणीपुजन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ.राऊत Advanced dental Clinic & Root Canal Center
दातांचा दवाखाना




उपलब्ध सुविधा...
- इंटराओरल कॅमेराद्वारे तपासणी
- डिजीटल एक्स-रे
- अत्याधुनिक यंत्रणेद्वारे रूट कॅनल ट्रिटमेंट
- वेदनारहित दात व दाढ काढणे
- पडलेले दात बसविणे
- दात साफ करणे
- दाताच्या रंगाचे सिमेंट भरणे/चांदी भरणे

डॉ.कौस्तुभ काशिनाथ राऊत
बी.डी.एस. (डेन्टल सर्जन)

उपलब्ध सुविधा...
- स्क्रुच्या सहाय्याने दात बसविणे (डेंटल इम्प्लांट)
- अक्कलदाढ काढणे
- वेडेवाकडे पुढे आलेले दात सरळ करणे
- अंशत: किंवा पूर्ण कवळी बसवणे
- हिरड्यांच्या रोगासाठी ट्रिटमेंट
- कॉस्मेटिक ट्रिटमेंट
- कर्करोगाचे निदान
- गरजेनुसार तज्ञ डॉक्टरांच्या भेटी

महात्मा गांधी शाळेच्या पाठीमागे, पुणे रोड, करमाळा. (मो.9552134186)

# ऑगस्ट उजडला तरीही विद्यार्थी गणवेशाच्या प्रतिक्षेतच !

करमाळा(सं.प्र.) : समग्र शिक्षा योजने अंतर्गत प्राथमिक शाळेतील पहिली ते आठवीमधील मुलींना व अनुसूचित जाती जमाती व दारिद्र्यरेषेखालील मुलांना शाळा सुरू झाल्यानंतर पहिल्याच दिवशी गणवेश, पाठ्यपुस्तके आणि शालेय साहित्य देण्याचे शासनाने आदेश दिले आहेत. परंतू जुनमध्ये शैक्षणिक सत्र सुरू होऊन ऑगस्ट महिना उलटला तरीही तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले नाही.

जिल्हा परिषद शाळेत येणारी बहुतांश मुले शेतकरी, मजूर, कष्टकरी घरातील असतात. त्यांना वेळेवर गणवेश, शालेय साहित्य दिले तर ही मुले नियमित शाळेत येतात. कष्टकरी वर्गातील अनेक पालक आपल्या मुलाला शैक्षणिक साहित्य देऊ शकत नाही. अशा पालकांना शिक्षण विभागाकडून मिळणारे शालेय साहित्य मोठा आधार असतो. शाळा सुरू होऊन दिड महिना उलटला तरी विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप केले नसल्याने पालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर गणवेश वाटप करण्याची मागणी पोफळज येथील अक्षय कुलकर्णी यांनी केली आहे.

हार्दिक अभिनंदन ! हार्दिक अभिनंदन !



सहकार सेनाप्रमुख

मा.आनंदराव आडसुळ (माजी खासदार)

सचिव, म.राज्य

मा.आनंद यादव

करमाळा ता.प्रमुख — श्री.नवनाथ रामदास गुंड
करमाळा ता.समन्वयक — श्री.पांडुरंग लोखंडे
करमाळा ता.सचिव — श्री.विठ्ठल मासाळ


विभागीय सचिव, प.महाराष्ट्र — मा.सुरज काळे
जिल्हा प्रमुख, सोलापूर — मा.वैभव देशमुख


शिवसेना पुरस्कृत शिवसहकार सेनेच्या करमाळा तालुका प्रमुख पदी **श्री.नवनाथ रामदास गुंड** यांची तर तालुका समन्वयक पदी **श्री.पांडुरंग लोखंडे** व तालुका सचिव पदी **श्री.विठ्ठल मासाळ** यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

शिवसेना पुरस्कृत करमाळा तालुका शिवसहकार सेना

# राष्ट्रवादी काँग्रेस पदवीधरचे अध्यक्ष रविदादा वळेकर यांचा वाढदिवस साजरा



करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी काँग्रेस पदवीधरचे तालुका अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते रविदादा वळेकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. वाढदिवस दिनी सुरुवातीला वळेकर यांनी श्री कमलादेवीचे दर्शन घेतले. तसेच इतर खर्चाला फाटा देत आपला वाढदिवस मुकबधीर मुलांसमवेत साजरा केला. यावेळी मुकबधीर विद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. निंभोरे गावातील या विकासप्रिय नेतृत्वाचा, सामाजिक आणि आर्थिक विकासाला प्राधान्य देऊन काम करणाऱ्या समाजसेवकाचा वाढदिवस गावात वृक्षारोपण, स्पर्धा परीक्षा, रांगोळी स्पर्धा, मैदानी खेळ, रक्तदान शिबीर, लसीकरण, आरोग्य शिबीर घेऊन साजरा केला जातो. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक वर्ग, कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहकार्य केले. यावेळी रविदादा वळेकर समवेत देवीचामाळ येथील शेखर जाधव, डॉ.शेंद्रे, समीर हलवाई, ईश्वर मस्के, नाथा शिंदे, राज पठाण तसेच देवीचामाळ येथील सहकारी उपस्थित होते.

# मानव एकता दिनानिमित्त रक्तदान शिबीर - २४१ रक्तदात्यांचा सहभाग



करमाळा(सं.प्र.) : मानव एकता दिनानिमित्त संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन शाखा करमाळा यांचे वतीने संत निरंकारी सत्संग भवन येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबीराचे उद्घाटन सोलापूर झोनचे प्रमुख प.पू.इंद्रपालसिंह नागपाल महाराज, ज्ञानप्रचारक प.पू.चांदभाई तांबोळी महाराज, जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप, पाटील गटाचे युवा नेते पृथ्वीराज पाटील, आदिनाथ कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन चंद्रकांत सरडे, वाशिंबेचे डॉ.सुदर्शन झोळ, माजी नगरसेविका स्वाती फंड, राष्ट्रवादी पदवीधरचे तालुका अध्यक्ष रविंद्र वळेकर, टेंभूर्णीचे अनिल पवार आदी मान्यवरांच्या उपस्थित झाले. उपस्थित मान्यवरांनी संत निरंकारी मंडळाच्या मानवतावादी कार्याचे कौतूक केले. आत्तापर्यंत करमाळा शाखेने एकूण ४७४० युनिट रक्तसंकलन केले आहे. या शिबीरात रक्तसंकलनाचे नियोजन सिव्हील हॉस्पिटल सोलापूर, दमाणी ब्लड बँक सोलापूर, रामभाई शहा रक्तपेढी बार्शी यांनी केले. रक्तदात्यांना प्रेरीत करण्यासाठी गावोगावी स्थानिक प्रबंधक, सेवादल बंधू-भगिणी व साधसंगतच्या वतीने जनजागृती करण्यात आली होती. शिबीर यशस्वी करण्यासाठी रमेश वारे, भैरु वळेकर, मुकुंद साळुंके, डॉ.भाऊसाहेब सरडे, मनधीर शिंदे, सर्व महिला व पुरुष सेवादल यांनी परिश्रम घेतले.

# घारगाव शाळेतील विद्यार्थ्यांना पाणी बॉटल व शैक्षणिक साहित्याचे वाटप



करमाळा(सं.प्र.) : ऐश्वर्या शासम फाऊंडेशन व सामाजिक कार्यकर्ते प्रविण होगले यांच्या वतीने घारगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पाणी बॉटल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विविध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा बक्षीसे देऊन गौरव करण्यात आला. यावेळी ऐश्वर्या शासन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दिपक शासम, त्यांच्या पत्नी श्रीमती शासम, राहुल कडाळे, गणेश हाके, श्रीमती सांची मॅडम, धीरज शासम तसेच कुरकुंभ येथील उद्योजक काकासाहेब निंबाळकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रविण होगले यांनी केले.

# भाजपाच्या वतीने पोथरे येथे मन की बात व टिफीन बैठक कार्यक्रम संपन्न



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका भाजपाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पोथरे येथील आनंदी लॉन्स मंगल कार्यालयात करण्यात आले. यानंतर सर्व बुथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख व पदाधिकारी यांची टिफीन बैठक संपन्न झाली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांनी टिफीन बैठकीचे महत्व सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर टिफिन बैठक आयोजित करण्यात येत आहे. आपल्याही तालुक्यात प्रत्येक रविवारी वेगवेगळ्या ठिकाणी टिफीन बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे चिवटे यांनी सांगितले.

या कार्यक्रमास भाजपाचे मोहन शिंदे, किरण बोकन, बिटरगावचे सरपंच डॉ.अभिजीत मुरूमकर, बाळासाहेब होसिंग, नितीन झिंजाडे, यशवंत झिंजाडे, आप्पा खटके, गणेश वाळुंजकर, पोथरेचे माजी सरपंच विष्णू रंदवे, मकाईचे माजी संचालक हरिभाऊ झिंजाडे, संतोष वाळुंजकर, दादा झिंजाडे, योगेश रंदवे, सुभाष शिंदे, नवनाथ नाळे, दादासाहेब शिंदे, धनंजय झिंजाडे, शामराव झिंजाडे, नामदेव शिंदे, सोमनाथ नंदरगे, शिवाजी रोहि, शहाजी शिंदे, महादेव गोसावी, भूषण नलवडे, विनोद इंदलकर, दगडू गोसावी यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
बार्शी
धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
कोर्ट समोर, करमाळा-परांडा बस स्टॉप, बार्शी.
मो.९७६७८९९५७१
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन
● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
● संडासवाटे रक्त येणे, पु येणे
● संडासची जागा बाहेर पडणे
● संडास जागी खाज व आग होणे
● संडासाचा नागवेडा
● संडास नंतर बसण्यास त्रास होणे
● भगंदर, फिशर
● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
करमाळा
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
स्थळ : सावंत हॉस्पीटल मेनरोड, सावंत गल्ली, करमाळा.
संपर्क : मो.7057675589 7350632138
टीप..
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
● नावनोंदणीसाठी संपर्क : मो.9405675887

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा...
आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोकलेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

## आमदार संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त...

# महाआरोग्य तपासणी व उपचार शिबीर-१३४० रूग्णांची तपासणी





करमाळा(सं.प्र.) : आमदार संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त चिखलठाण नं.१ येथे आयोजित केलेल्या मोफत महाआरोग्य तपासणी व उपचार, मोफत औषध वाटप शिबीरात एकूण १३४० रूग्णांची तपासणी करण्यात आली. या शिबीराचे आयोजन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, चिखलठाण सोसायटीचे चेअरमन विकास गलांडे, जाणता राजा मित्र मंडळ चिखलठाण तसेच शिवसेना वैद्यकिय कक्ष व डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन यांनी केले.

महाआरोग्य शिबीरामध्ये ७१८ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ६३२ जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. चष्मे वाटपाचा संपूर्ण खर्च राजेंद्र बारकुंड यांनी केला. या शिबीरात ८६ नेत्ररूग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले. तसेच ८५० लोकांचे विविध आजाराची तपासणी करून त्यांना मोफत औषधे वाटप करण्यात आले. तसेच २८ जणांची इसीजी काढण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे यांचे हस्ते झाले. यावेळी तहसीलदार विजय जाधव, गटविकास अधिकारी राजाराम भोंग, शिवसेना जिल्हा प्रमुख महेश चिवटे, पत्रकार नासीर कबीर, उपअभियंता उबाळे, कुगावचे सरपंच सागर पोरे, सोगावचे सरपंच विनोद सरडे, चिखलठाण सोसायटीचे चेअरमन विकास गलांडे यांचेसह गणेश कानगुडे, दिनकर सरडे, केरू गव्हाणे, इन्नुस सय्यद, कैलास बोंद्रे, गजेंद्र पोळ, नाईकनवरे महाराज, थोरात गुरूजी, समाधान गव्हाणे, महादेव कामटे, सतीश बनसोडे, अतुल जानभरे, प्रथमेश उंबरे, श्रीपाल गव्हाणे, हेमंत बारकुंड, डॉ.ब्रिजेश बारकुंड, डॉ.अक्षय गव्हाणे, राजेंद्र चव्हाण, रणजित गव्हाणे, विवेक जानभरे, सोमनाथ राऊत, सोन्या नलवडे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक गुंजवटे यांनी अशाप्रकारचे शिबीर तालुक्यातील प्रत्येक गावात घेण्यात यावेत; अशी इच्छा व्यक्त केली.

महेश चिवटे यांनी मुख्यमंत्री व शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष व डॉ.श्रीकांत शिंदे वैद्यकिय फाऊंडेशन यांचे वतीने शिबीरासाठी औषधे दिली. तसेच पुढील गंभीर आजारावर मोफत उपचार करून देण्यात येणार असल्याचे सांगितले. या शिबीराचे नियोजन यशस्वीरित्या केल्याबद्दल राजेंद्र बारकुंड यांचे चिवटे यांनी कौतूक केले.

मुख्यमंत्रीचे विशेष कार्यकारी अधिकारी व वैद्यकिय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांचे सहकार्यातून करमाळा तालुक्यामध्ये सर्वसामान्य व गोरगरीब रूग्णांना मोफत रूग्णसेवा मिळत असल्याने चिवटे यांचे राजेंद्र बारकुंड यांनी विशेष कौतूक केले.

या आरोग्य शिबीरात चिखलठाण नं.१ व २, केडगाव, कुगाव, शेटफळ, दहिगाव, वांगी, सोगाव येथील नागरीकांनी सहभाग नोंदवला. तसेच उपजिल्हा रूग्णालय करमाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र जेऊर, सुश्रुत हॉस्पीटल करमाळा चे डॉ.गायकवाड, ठाणे येथील डॉ.आहिरे व त्यांची टीम, सर्व आरोग्य सेवक, आशा वर्कर यांनी रूग्णांची तपासणी करून गोळ्या, औषधाचे वाटप केले. हे शिबीर श्रीनाथ मंगल कार्यालय येथे आयोजित केले होते.


# पुणे राष्ट्रवादी युवतीच्या अध्यक्ष पदी पुजा झोळे



करमाळा(सं.प्र.) : पुणे राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या अध्यक्ष पदी करमाळा शहरातील रंभापुरा भागातील रहिवाशी पुजा गणेश झोळे हिची निवड करण्यात आली आहे.

पुजा झोळे ही गरीब शेतकरी कुटूंबातील युवती असून मोठ्या कष्टातून तिने शिक्षण घेऊन पुणे येथे पुढील शिक्षणासाठी गेली. त्या ठिकाणी तिने आपली छाप उमटवली तर मराठा क्रांती मोर्चामध्ये तिने हिरिरीने भाग घेऊन महिलांचे नेतृत्व केले. या निवडीचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार, ना.छगन भुजबळ, ना.सुनिल तटकरे, रूपालीताई चाकणकर, अदिती तटकरे आदी मान्यवरांच्या उपस्थित पुजा झोळे यांना देण्यात आले. पुजा झोळे यांच्या निवडीचे स्वागत करमाळा तालुक्यातील विविध संघटना व नेत्यांनी केले.


# यशराज कास्यथाळी फुट मसाज सेंटर




**पायाला मसाज म्हणजे संपूर्ण शरीराला मसाज**




वात, पित्त आणि उष्णतेच्या त्रासाने बेजार आहात ? तर आजच भेट द्या..!

कांस्य वाटी विसरा आता आले.. कांस्य मसाज यंत्र !

**कांस्याच्या थाळीने मसाज का करावा..?**

- शरीरातील वातीचे प्रमाण कमी करण्यासाठी
- शरीरातील वाढलेली अतिरिक्त उष्णता कमी करण्यासाठी
- डोळ्याच्या स्नायुंना चालना मिळविण्यासाठी
- शरीरातील थकवा कमी होवून थंडावा वाढविण्यासाठी
- मधुमेहामुळे होणाऱ्या पायाच्या संवेदना कमी करण्यासाठी
- निद्रानाशाची समस्या आटोक्यात राहण्यासाठी
- पित्ताचा त्रास कमी करण्यासाठी
- गुडघेदुखी, टाचदुखी, कंबरदुखी अशा त्रासाचे प्रमाण कमी करण्यासाठी
- पायावरची सुज तसेच तळपायाला भेगा पडणे तसेच पायाची जळजळ होणे, अशा समस्या कमी करण्यासाठी
- व्हेरीकॉज व्हेन्स(Vericose Vains) वर उपयुक्त
- डोळ्याखालील काळेपणा व चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी
- शरीरातील रक्तप्रवाह सुरळीत करण्यासाठी

**वेळ : सकाळी ९ ते रात्री १० पर्यंत**

**पत्ता : म.गांधी हायस्कुलच्या पाठीमागे, पुणे रोड, पाठक सर कॉम्प्लेक्सच्या पाठीमागे, मोरे आण्णा बिल्डींग, महेंद्रनगर, करमाळा.**

**संपर्क : मो.8380072334, 7796012086**



राष्ट्रवादी युवती काँग्रेस
पुणे च्या अध्यक्षपदी
करमाळा येथील रहिवाशी
**पुजा गणेश झोळे**
यांची निवड झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन**

शुभेच्छुक



**यशराज गणेश आर्ट**
गणेश मुर्ती कारखाना
कुंभारवाडा, करमाळा.
१ ते ५ फुटापर्यंतच्या गणेश मुर्ती तसेच महालक्ष्मी मुखवटा मिळतील.
प्रोप्रा : राजेंद्र कुंभार आजच बुकींग करा..! संपर्क : 9309569256, 9822118815

**सौजन्य : संत गोरोबा वीट कारखाना, करमाळा.**

---

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट..नी रुचकर..

# चिवटे उपहारगृह

येथे साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट |
|---|---|---|---|
| इडली सांबर | पुरी भाजी | पावभाजी | पाणीपुरी |
| उडीदवडा सांबर | मिसळ पाव | तवापुलाव | स्पे.भेळ |
| उत्तप्पा | पोहे/उपमा | सँडविच | रगडा पॅटिस |
| डोसा | दहीवडा/शिरा | फिंगर चिप्स | राज कचोरी |

| स्विट | नमकिन | डेअरी | कोल्ड्रींक |
|---|---|---|---|
| पेढा, बर्फी | फरसान | दही, दुध | कोल्डकॉफी |
| लाडू, जामून | शेव | खवा, पनीर | ज्युस |
| मैसुरपाक | स्पे.चिवडा | बासुंदी | मिल्कशेक |
| काजू कतली | पापडी | लस्सी | आईस्क्रीम |

**एक वेळ अवश्य भेट द्या !**

राशिन पेठ, करमाळा, जि.सोलापूर - मो.९००६९४३००६

---

# शिंदे हॉस्पिटल

शाहूनगर, बायपास रोड, करमाळा.

**प्रथम वर्धापन दिन**

आपणा सर्वांचा स्नेह व अखंड प्रतिसादामुळे मंगळवार दि.१५/८/२०२३ रोजी सुसज्ज नवीन इमारतीमध्ये दुसऱ्या वर्षात पदार्पण करीत आहोत. यानिमित्त...

## मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर

**दि.१५/८/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते सायं. ५.०० पर्यंत**



मोफत आरोग्य तपासणी...
- बी.एम.डी.(हाडांची घनता तपासणी)
- युरीक ॲसिड तपासणी

हार्निया
हायड्रोसिल
मुळव्याध अपेंडिक्स
भगेंद्र मुतखडा ऑपरेशन
**40% सवलत**

### खालील आजारांवर निदान व उपचार..

एम.जी.एम. मेडिकल कॉलेज, औरंगाबाद येथील सुप्रसिध्द सर्जन व पोटाचे विकार तज्ञ डॉ.प्रफुल्ल पवार

- पोट दुखणे, फुगणे, गच्च होणे
- पोट साफ न होणे
- छातीत जळजळ होणे, मळमळ व उलट्या होणे
- जुलाब, बध्दकोष्ठता
- रक्ताच्या उलट्या होणे
- शौचातून रक्त जाणे
- भुक मंदावणे, रक्त कमी होणे
- अन्न गिळताना त्रास होणे
- कावीळ होणे

एंडोस्कोपी **1000** रूपये

**एंडोस्कोपी म्हणजे काय ?** एंडोस्कोपी म्हणजे एक खास तंत्रज्ञान ज्याच्या सहाय्याने अन्न नलिकेतून जठर आणि छोट्या आतड्याची सुरूवात प्रत्यक्ष पहाता येते.
**एंडोस्कोपीची गरज कोणाला असते ?** ● अपनाचा त्रास होणे ● व्यवस्थित गिळता न येणे ● उलटीमधून रक्त पडणे ● संडास काळी पडणे ● जुना यकृताचा आजार इ.

हाडांचे ऑपरेशनमध्ये **40% सवलत** दि.१५/८ ते ३०/८ २०२३ पर्यंत राहील

- अंगावरील लहान गाठ काढणे रू.2000/-
- उपलब्ध सुविधा... मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी महाराष्ट्र शासन

* नियम व अटी लागू..

आपले विनीत : डॉ.दयानंद गुणवंतराव शिंदे(ऑर्थोपेडीक) डॉ.सौ.चेतना शिंदे (B.A.M.S.) डॉ.प्रफुल्ल पवार (M.S.Gen & Laproscopy Surgeon)

**पत्ता : शिंदे हॉस्पिटल, शाहूनगर, बायपास रोड, करमाळा. जि.सोलापूर**
नावनोंदणी संपर्क : मो.7350878403, 9119537080, 9823312622

## जिल्हापरिषद सेस निधी योजनेअंतर्गत मिळणाऱ्या

# कृषी औजारासाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावेत : गणेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : जिल्हा परिषद सेस निधी योजने अंतर्गत ५० टक्के व ७५ टक्के अनुदाति कृषी औजारा साठी शेतकऱ्यांनी अर्ज करावेत; असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांनी केले.

याबाबत माहिती देताना चिवटे म्हणाले, की सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी सोलापूर जिल्हा परिषद सेस फंडातून अनुदानावर कृषी औजारे उपकरणे, यंत्र वाटप करण्यात येणार आहे. यानुसार सर्वसाधारण शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर कृषी औजारे मिळणार आहेत. तसेच महिला व दिव्यांग शेतकऱ्यांसाठी ७५ टक्के अनुदान उपलब्ध होणार आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना पिक संरक्षण औजारे (थ्री पिस्टन स्प्रेपंप, बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, ब्रशकटर, सोलार इन्सेक्ट ट्रॅप), कृषी अभियांत्रिकी योजनेतून रोटाव्हेटर/ पॉवर टिलर, पल्टी नांगर, पेरणी यंत्र, कल्टीव्हेटर इ. कृषी सिंचनासाठी सुधारीत औजारे व साधने पुरविणे - ५/७.५ एचपी विद्युत ओपनवेल सबमर्सिबल पंसंच, ४/५ एचपी डिझेल इंजिन/तुषार सिंचन व सुधारीत औजारे साहित्य पुरवठा करणे, कडबाकुट्टी, ताडपत्री, स्लरीफिल्टर आदी कृषी औजारे मिळणार आहेत. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपले अर्ज पंचायत समिती करमाळा यांचेकडे करावेत. तसेच अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी भाजपा संपर्क कार्यालयाशी संपर्क साधावा; असेही आवाहन चिवटे यांनी केले आहे.

## कै.डॉ.शुभदा पुंडे यांच्या स्मरणार्थ

# साडे हायस्कुल साडे मधील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



करमाळा(सं.प्र.): येथील कै.डॉ.शुभदा पुंडे यांच्या स्मरणार्थ आदिनाथ कारखान्याचे माजी संचालक डॉ.वसंतराव पुंडे यांचे वतीने साडे हायस्कुल उच्च माध्यमिक विद्यालयील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश मस्के हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील उपस्थित होते. यावेळी तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत नववी व दहावीच्या गटातून प्रथम आलेली प्रगती किशोर चव्हाण व सातवी व आठवी गटातून तृतीय आलेली अक्षता वेदपाठक यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गोकुळबापू पाटील, डॉ.वसंतराव पुंडे, देविदास ताकमोगे, बाजीराव माने, बाळासाहेब ढवळे, निलीमा पुंडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी करे-पाटील, निलीमा पुंडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक रविंद्र पाटील यांनी केले तर सुत्रसंचालन सचिन गाडेकर यांनी केले. आभार सचिन कुलकर्णी यांनी मानले.

आयुर्वेदाचार्य
डॉ.वेदिका गुंजकर
आता आपल्या करमाळा शहरात !
वेळ १० ते २

■ स्त्रीरोग ■ पोटाचे विकार
■ बालरोग ■ सौंदर्यविषयक उपचार
■ वातविकार ■ अस्थमा
त्वचा विकार इ. रोगांवर आयुर्वेदिक चिकित्सा व पंचकर्म उपलब्ध !



पंचकर्म व उपक्रम उपलब्ध...
बस्ती, कटीबस्ती, जानुबस्ती, मन्याबस्ती, पुष्टबस्ती, शिरोधारा, नस्य, अग्निकर्म, रक्त-मोक्षण, जलौका चिकित्सा, लेप चिकित्सा, सुवर्णप्राशन संस्कार प्रत्येक महिन्याच्या पुष्य नक्षत्रावर
रविवारी सुट्टी
पत्ता : अभंग आयुर्वेद, शिवाजीनगर, करमाळा.

# गटारीवर लोखंडी बरॅक टाकून गटार झाकण्याचे काम कमकुवत

## करमाळा शहरवासियांची ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी

करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरातील वेगवेगळ्या चौकातील गटारीवर लोखंडी बरॅक टाकून गटार झाकण्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. सदरची कामे कमकुवत झाली असून, त्यात गुणवत्ता नसल्याने पालिकेने तज्ञा मार्फत चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी; अशी मागणी शहरवासियातून होत आहे.

करमाळा शहरातील वेताळपेठ, दगडीरोड, फुलसौंदर चौक, मंगळवार पेठ, राशिनपेठ आदी ठिकाणी गटारीवर लोखंडी बरॅक टाकून गटारी झाकण्याचे काम नुकतेच करण्यात आले आहे. सदरचे काम हे कमकुवत असून योग्य गुणवत्तेचे लोखंड न वापरता तसेच कॉंक्रीटकरणाचे काम अतिशय ठिसुळ असून गटारीच्या आतील बाजूस कॉंक्रीटीकरणाचे धपले पडलेले आहेत. अशा स्थितीत संबंधित ठेकेदाराची चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी; अशी शहरवासियांची मागणी आहे.

# रावगाव येथे सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेविषयी मार्गदर्शन शिबीर



करमाळा(सं.प्र.) : साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे जयंतीचे औचित्य साधून प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या वतीने रावगाव येथे प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेविषयी मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे उपस्थित होते.

शिबीराची सुरूवात महापुरूषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी बोलताना चिवटे म्हणाले, की प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना खूप चांगली आहे. याचा सर्व तरूण शेतकरी, महिला बचत गटाचे सदस्य यांनी लाभ घ्यावा व गावातच रोजगार निर्माण करावा. प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानचे कार्य उल्लेखनीय असून प्रतिष्ठानच्या माध्यमातून असेच योजनांचे उपक्रम राबावेत; असे आवाहन केले. कृषी विभागाचे जिल्हा संसाधन व्यक्ती मनोज बोबडे यांनी सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ सर्व स्तरातील नागरीकांनी घ्यावा. या योजनेच्या माध्यमातून ३५ टक्के अनुदान दिले जाते. योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी विभागाशी संपर्क साधावा; असे आवाहन केले.

या कार्यक्रमास सरपंच दादासाहेब जाधव, लिंबेवाडीचे सरपंच किरण फुंदे, मकाईचे संचालक गोवर्धन करगळ, माजी ग्रामपंचायत सदस्य दासा बापू बरडे, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष आजिनाथ सुरवसे, माजी उपसरपंच काका पवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कांबळे, राजीव गांधी सार्वजनिक वाचनालयाचे सचिव भास्कर पवार, भाऊसाहेब करगळ, रहेमान शेख, कृषी विभागाचे श्री.नवले, मंगेश भांडवलकर, सोसायटीचे चेअरमन शहाजी सुरवसे, माजी ग्रा.पं.सदस्य भाऊसाहेब बुधवंत, अतुल पवार, कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर खाडे, हनुमंत लोंढे, पप्पू पवार, लखन पवार, संदीप पवार, अमोल पवार, राहुल गोसावी, पंडित नागवले, प्रल्हाद कांबळे व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास कांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रशांत शिंदे यांनी मानले.

म्हशीचे शेणखत
विकणे आहे
संपर्क : 8459423321, 7522134272
पत्ता : मच्छिंद्र मावलकर, मावलकर वस्ती, झरे, ता.करमाळा.

# केळी संशोधन केंद्र शेलगाव(वांगी) येथेच व्हावे

## शेतकऱ्यांनी एकत्र येऊन पाठपुरावा करण्याचा ठराव

करमाळा(सं.प्र.) : केळी संशोधन केंद्र शेलगाव(वांगी) येथेच व्हावे; अशी मागणी करमाळा तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांमधून होत असून या मागणीसाठी शेलगाव येथे झालेल्या बैठकीत गट-तट व पक्षाचा विचार न करता एकत्र येऊन पाठपुरावा करण्याचा ठराव करण्यात आला आहे. विधानसभा अधिवेशनामध्ये सोलापूर जिल्ह्यातील शेलगाव येथील कोरडवाहू संशोधन केंद्राच्या ठिकाणी केळी संशोधन केंद्र सुरू करण्याविषयी आमदार बबनराव शिंदे यांनी लक्षवेधी मांडली होती. त्यावेळी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी राहुरी कृषी विद्यापीठाचा या संदर्भात आलेल्या अभिप्रायाचा आधार घेत, या ठिकाणचे कोरडवाहू संशोधन केंद्र बंद करता येणार नसल्याचे सांगत, इतर ठिकाणी जागा सुचवण्याविषयी सांगितले होते. परंतु शेलगाव येथे झालेल्या बैठकीच्या वेळी केळी उत्पादक शेतकरी किरण डोके यांनी यापूर्वी झालेल्या पत्रव्यहारांमध्ये कृषी विद्यापीठाचा या संदर्भातील शेलगाव येथे संशोधन केंद्र सुरू करण्याबाबतचा सकारात्मक अहवाल असल्याची माहिती या बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांना दिली. या ठिकाणी पूर्वीचे संशोधन केंद्र बंद न करता केळी संशोधन केंद्र सुरू होऊ शकते. कृषी विद्यापीठ व कृषी विभागाकडील शासनाची साधारण शंभर एकर जमीन यासाठी उपलब्ध होऊ शकते. यासंबंधी कृषीमंत्र्याची भेट घेऊन त्यांना वस्तुस्थिती लक्षात आणून द्यावी व यासंबंधी पाठपुरावा करावा; असा ठराव उपस्थित शेतकऱ्यांनी केला आहे.या बैठकीस बाजार समितीचे सभापती शिवाजीराव बंडगर, किरण डोके, केळी उत्पादक संघाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, लोकविकास डेअरीचे दिपक देशमुख यांनी आपली मते व्यक्त करून केळी संशोधन केंद्राची आवश्यकता, त्याचे फायदे व केळी संशोधन केंद्र व्हावे याकरीता सुरू असलेली प्रशासकीय पातळीवरील कार्यवाही याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. या बैठकीस शेलगावचे सरपंच अमर ठोंबरे, भाजपाचे अमरजित साळुंके, वांगीचे मजी सरपंच विठ्ठल शेळके, माजी उपसरपंच गणेश तळेकर, रामेश्वर तळेकर, हनुमंत रोकडे, जालिंदर पांढरमिसे, शुभम बंडगर, अमर आरकिले, नागनाथ जाधव, ऋषीकेश रोडे, गणेश पाटील, दत्ता देशमुख, वैभव पाटील, वांगी विकास सोसायटीचे चेअरमन डॉ.विजय रोकडे, शंकर तावसे, हनुमंत यादव, विठ्ठल केकान, नागनाथ मंगवडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# करमाळा तालुक्यात पुन्हा बिबट्याची दहशत

## मांगी परिसरात बिबट्या दिसल्याने नागरीकांमध्ये घबराहट



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यात पुन्हा एकदा बिबट्याचे संकट आले असून ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी मांगी शिवारात बिबट्या दिसला असून याचा प्रत्यक्ष व्हिडीओ प्रितम माळी यांनी काढला आहे. सायंकाळी चार वाजण्याच्या दरम्यान प्रितम माळी हे आपल्या चारचाकीतून पोथरे येथे लिंबू काट्यावर टाकून परत मांगीच्या दिशेने येत असताना त्यांना रस्त्यात त्यांच्या पिकअप गाडीला रंदवे वस्ती जवळ बिबट्या आडवा गेला. त्यानंतर त्यांनी तातडीने त्याचा व्हिडीओ काढून सोशल मिडीयावर व्हायरल केला. हा व्हिडीओ व्हायरल होताच पोथरे, मांगी परिसरात मोठी घबराहट निर्माण झाली आहे. वनविभागाने या बिबट्यास तातडीने पिंजरा लावून जेरबंद करावे; अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# श्रीमद भागवत कथेची उत्साहात सांगता





करमाळा(सं.प्र.) : सोहम मित्र मंडळ राशीनपेठ तर्फे गुरूप्रसाद मंगल कार्यालय येथे आयोजित श्रीमद् भागवत कथेची सांगता ३ ऑगस्ट रोजी उत्साहात झाली. २८ जुलै पासून हा भागवत सप्ताह चालू होता. सोहम महिला मंडळा मार्फत सतत धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. २८ जुलै पासून दुपारी दोन ते सायंकाळी पाच पर्यंतच कथा सांगण्यात आली. परम श्रध्देय भागवताचार्य श्री कौस्तुभजी (रामदासी) महाराज यांनी कथा सांगितली आहे. ३ ऑगस्टला कथेचा समारोप झाला असून करमाळा शहरातून महिलांची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. महाप्रसादाने कथेची सांगता झाली. या कथेसाठी चिवटे परिवाराचा मोठा सह्योग लाभला. आठ दिवस चालू असलेल्या या सप्ताहात कथा ऐकण्यासाठी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: करमाळा तालुक्यातील लोकांस कळविण्यात येते की..

**मिळकतीचे वर्णन :** मौजे लव्हे, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील गट नं.८६, क्षेत्र- २ हे. ७१ आर + २ हे. ६९ आर + २ हे. ६९ आर एकूण ८ हे. ०९ आर. वरील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल श्री.अनिल नामदेव पाटील रा.लव्हे, ता.करमाळा, जि.सोलापूर यांची वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची असून काही कारणाने अनिल नामदेव पाटील व त्यांची आई रूक्मीणीबाई नामदेव पाटील यांनी सदरची मिळकत सुरेश शंकर वळेकर यांचे नावे केली होती. त्यानंतर सदरची मिळकत आमचे अशिल व त्यांची आई यांनी त्यांचे जवळचे नातेवाईक सुशिला तुकाराम खरजे यांचे नावे सुरेश शंकर वळेकर यांचेकडून परत घेतली. त्यावेळी सुशिला यांनी सदर मिळकतीची आमच्या अशिलांना उलटून खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले होते. त्यामुळे सदर मिळकतीची कब्जे वहिवाट पूर्वीपासून आमचे अशिलांकडेच होती व आहे. मात्र कालांतराने आमचे अशिलांचे परस्पर सदर सुशिला तुकाराम खरजे यांनी वरील मिळकतीचे वाटप केल्याचे दाखवून २ हे. ६९ आर इतकी मिळकत स्वत:च्या नावे, २ हे. ६९ आर तिचे पती तुकाराम धनाजी खरजे यांचे नावे व २ हे. ७१ आर मुलगा कमलाकर तुकाराम खरजे यांचे नावे केली. सदर मिळकतींची कब्जे वहिवाट आमचे अशिलांकडेच असल्यामुळे व वरील तिघेही आमचे अशिलांचे जवळचे नातेवाईक असल्यामुळे आमचे अशिलांनी त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु आमचे अशिलांना नुकतीच माहिती मिळाली की, सुशिला तुकाराम खरजे व तुकाराम धनाजी खरजे हे मयत असल्यामुळे कमलाकर तुकाराम खरजे हा सदर मिळकतीची विक्री करण्याच्या प्रयत्नात असून त्याबाबत त्याने काही गिऱ्हाईकांशी बोलणी सुरू केली आहे. सदर मिळकत आमचे अशिलांची वडिलोपार्जित मिळकत असून त्यावर आमचे अशिलांचीच कब्जे वहिवाट आहे. सबब या नोटीसीने कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीचा कुणीही खरेदी-विक्री, गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस इ. व्यवहार करू नये. कुणाची फसगत होऊ नये म्हणून सदरची नोटीस दिली. ता.३/८/२०२३

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड.सविता शिंदे**
**विद्यानगर, करमाळा.,जि.सोलापूर**

# घरजागा खरेदी-विक्री पूर्व जाहीर नोटीस

जिल्हा सोलापूर येथील तमाम लोकांना कळविण्यात येते की, विशेषत: मौजे करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर पैकी विशेषत: करमाळा शहरामधील लोकांना कळविणेत येते की.. आमचे अशिल श्री.बलराज बालमुकूंद परदेशी, वय-३९, रा.सुतारगल्ली, करमाळा., ता.करमाळा, जि.सोलापूर. मो.९९७०७२४९०९ यांच्या वडीलोपार्जीत मिळकती करमाळा शहरामध्ये आहेत. त्यांचा (१) सि.स.नं. ३२२८, क्षेत्र - ३८४.८० चौ.मी. (२) सि.स.नं.३२२७ क्षेत्र - १६९.१० चौ.मी. (३) सि.स.नं. ३२५३, क्षेत्र - ४५८.५० चौ.मी. (४) सि.स.नं. ३२४३, क्षेत्र - ४४०.०० चौ.मी. अशा वर्णनाच्या मिळकती आहेत. त्यापैकी काही मिळकती खुल्या जागेच्या स्वरूपात आहेत तर काही मिळकतीमध्ये आमच्या अशिलाचे राहते घर व स्वॉ मिल आहेत. उपरोक्त मिळकतीमध्ये आमच्या अशिलाचे कायदेशीर हितसंबंध व अधिकार आहेत.

आमच्या अशिलाच्या परस्पर उपरोक्त मिळकती पैकी काही मिळकतीचे सह हक्कदार हे विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहे; असे आमच्या अशिलांना समजले आहे. त्यामुले आमचे अशिल हे सदरच्या नोटीसद्वारे कळवू इच्छीतात की, या मिळकतीमधील सह हक्कदार आमच्या अशिलाच्या परस्पर इतर कोणास सदर मिळकतीची खरेदी-विक्री, गहाण-दान, लिझ इ. तत्सम स्वरूपाचे व्यवहार केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही जो कोणी सदर मिळकतीबाबत तत्सम स्वरूपाचे व्यवहार करेल त्याची राहील. त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत व त्यांच्यावर सदरचा व्यवहार कायद्याने बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. याकरीता आमचे अशिल उपरोक्त मिळकतीबाबत सदरचे जाहीर नोटीस प्रसिध्दीस देत आहे. उपरोक्त मिळकतीबाबत आमचे अशिलाचे कायदेशीर हक्क हितसंबंध अधिकार असल्यामुळे संबंधितांनी सदरची नोटीस प्रसिध्द केल्यापासून १५ दिवसाच्या आत जर कोणाची तक्रार असल्यास त्यांनी आमच्या अशिलांना समक्ष भेटावे व सदर मिळकतीमध्ये आमच्या अशिलाचा हक्क हितसंबंध असल्यामुळे सदर मिळकतीबाबत गहान, दान, लिझ इ. तत्स स्वरूपाचे व्यवहार कोणी करू नये व कोणी केले असतील तर त्याबाबतची रितसर माहिती द्यावी. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. इतर कोणाची फसवणूक होऊ नये म्हणून सदर बाबत वरील मिळकतीबाबतची जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहे.

**अशिला तर्फे ॲड.**
**श्री.शिरीषकुमार भा. लोणकर (ॲडव्होकेट)**
**नोटरी पब्लिक (महाराष्ट्र सरकार) करमाळा, जि.सोलापूर**

# खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: करमाळा शहर व तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की.. मिळकत डि.सोलापूर, सब डि. व ता.करमाळा, जि.प.सोलापूर, पं.स.करमाळा, ग्रामपंचायत पांडे हद्दीतील मौजे पांडे येथील शेतजमीनी. अ) क.ग.नं.१२२/१ पैकी पूर्वेचे, क्षेत्र - १ हे. ६१ आर, आकार - २ रू. ३१ पैसे. ब)क.ग.नं.१२२/२ संपूर्ण, क्षेत्र - १ हे. २१ आर, आकार - २ रू. २१ पैसे. क) क.ग.नं.१२२/३ संपूर्ण, क्षेत्र - २ हे. २१ आर, आकार - ४ रू. ५५ पैसे. येणेप्रमाणे वरील वर्णनाच्या मिळकती आतील सर्व तदंगभूत वस्तुंसह.

वरील वर्णनाची मिळकत गट नं.१२२/१ पैकी पुर्वेची श्री.कन्हैयालाल देवी तर गट नं.१२२/२ श्री.अनुज देवी तर गट नं.१२२/३ सौ.सुनिता देवी यांच्या मालकीच्या मिळकती असून ते सदर मिळकतीचे कायदेशीर मालक वहिवाटदार आहेत. त्याप्रमाणे त्यांची गावचे दप्तरी मालकी हक्काची कब्जेवहिवाटीची नोंद झालेली असून सदर मिळकती मालकी हक्काने त्यांचे कब्जेवहिवाटीस आहेत. सदर वरील नमूद मिळकती सदर श्री.कन्हैयालाल, श्री.अनुज व सौ.सुनिता देवी यांनी आमचे अशिलांना कायम व खुषखरेदी देणेचे ठरवून आमचे अशिलांचे पासून विसाराची रक्कम घेतलेली असून सदर मिळकती निर्वेध व निजोखमी असलेची हमी व खात्री त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तशी आमचे अशिलांची देखील खात्री झालेली आहे. तथापि वरील नमूद मिळकतीमध्ये इतर कोणाचा, कोणतेही प्रकारचे हक्क, अधिकार, हितसंबंध, गहाण, दान, लीज पोटगी, बक्षिस, गहाणखत, साठेखत अथवा कोर्ट प्रकरण अथवा इतर कायदेशीर हक्क अथवा तत्सम स्वरूपाचे हक्क, हितसंबंध असलेस सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही, कोणतीही तक्रार न आलेस सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही, कसलीही हरकत अगर तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

ता.३/८/२०२३

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड.कमलाकर विश्वनाथ वीर (बी.ए.एलएल.बी.)**
**(रजि नं.महा/२१८६/१९९३) शिवाजीनगर, करमाळा.**

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.
वर्षभर घरपोच अंक मिळवा..!

# विहिरीवरील मोटारची चोरी

करमाळा(सं.प्र.) : विहिरीतील पाणी काढण्यासाठी लावलेली मोटार चोरट्याने चोरून नेली आहे. हा प्रकार सालसे येथे २६ जुलैला मध्यरात्री घडला आहे. यात निलेश विलास सालगुडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की सालसे येथील आमच्या शेतातील विहिरीचे पाणी काढण्यासाठी टेक्स्मो कंपनीचा पंप विहिरीवर ठेवलेला होता. २६ जुलैला चार वाजता पाणी काढले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी २७ जुलैला शेतात गेलो असता चोरट्याने ती मोटार चोरून नेल्याचे दिसून आले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## वेगात मोटारसायकल
# चालविणाऱ्याविरूध्द कारवाई

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातून वेगात मोटारसायकल चालविणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार २९ जुलैला दुपारी तीन वाजता बसस्थानकाजवळ घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दिपक नागन्नाथ कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. यात त्यांनी म्हटले आहे, की आम्ही करमाळा शहरातील बसस्थानका जवळील संगम चौकात वाहतुकीचे नियमन करत असताना शिवाजी यादव शिंदे (रा.पोथरे) हा त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एमएच ४५ एएम २८६८ ही रस्त्याचा विचार न करता बेफामपणे चालवत असताना आढळून आला. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## चाड्या का सांगतो म्हणून
# चौघांकडून दोघास मारहाण

करमाळा(सं.प्र.) : चाड्या का सांगतो.. असे म्हणून चौघांनी मायलेकरास मारहाण केली आहे. हा प्रकार ३१ जुलैला सकाळी रात्री साडेनऊ वाजता खडकी येथे घडला आहे. या प्रकरणी विजयदादा हरी शिंदे (रा.खडकी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझा चुलता साहेबराव शिंदे, चुलती मैनाबाई शिंदे, चुलतभाऊ अरूण शिंदे व सागर शिंदे यांनी तु आमच्याबद्दल आजोबाला काय सांगतो.. असे म्हणून मला व माझ्या आईला दगडाने व कोयत्याने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## संस्थेचा अध्यक्ष नसताना अध्यक्ष आहे असे भासवून
# फसवणूक करणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : संस्थेचे अध्यक्ष नसताना अध्यक्ष आहे असे भासवून शिक्का तयार करून खोटे कागदपत्रे करणाऱ्याविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक गुलाबराव बागल यांनी न्यायालयात फिर्याद दिली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर या प्रकरणी पोलीसात १ ऑगस्टला गुन्हा दाखल झाला आहे. त्या फिर्यादीत श्री.बागल यांनी म्हटले आहे, की.. कर्मवीर आण्णासाहेब जगताप संचलित करणाऱ्या समाजसेवा मित्र मंडळ या ट्रस्टचा १९८६ पासून सचिव आहे. या ट्रस्ट मध्ये अभयकुमार शांतीलाल सोळंकी हे काही वर्षे विश्वस्त म्हणून कार्यरत होते. पुढे त्यांचे विश्वस्त पद रद्द झालेले आहे. २००७ पासून सोळंकी हे संस्थेवर विश्वस्त नव्हते किंवा अध्यक्ष नव्हते, याची त्यांना जाणीव असूनही व त्यांना शिक्षणाधिकारी यांनी लेखी समज देऊनही या संस्थेच्या कामकाजात ते हस्तक्षेप करीत आहेत. शिवाय अध्यक्ष असल्याचे भासविण्याकरीता लेटरपॅड तयार करून अध्यक्ष असल्याचे शिक्के तयार करून घेतले आहेत. खोट्या व बनावट लेटर पॅडवर खोट्या शिक्क्याचा गैरवापर करून लेखापरिक्षक तसेच शिक्षण उपसंचालक आदींना पत्रे पाठवून गंभीर स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत. बनावट कागदपत्रे करून संस्थेची व शासनाची फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# बसस्थानकातून पर्स पळवली - ३८ हजाराचा ऐवज लंपास

करमाळा(सं.प्र.) : येथील बसस्थानकातून पिशवीत असलेली दागिणे व नोटांची पर्स चोरट्यांनी पळवली आहे. त्यातील ३८ हजाराचा ऐवज लंपास केला आहे. हा प्रकार २८ जुलैला दुपारी तीनच्या दरम्यान येथील बसस्थानकातील फलाट क्र.१ वर घडला आहे. या प्रकरणी लक्ष्मण भगवंत नीळ (रा.निमगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २८ जुलैला आम्ही बसस्थानकावर असताना माझी पत्नी लता हिच्या हातात काळ्या पिशवीत लहान पर्स ठेवली होती. चोरट्यांनी ती पर्स लंपास केली आहे. त्यात ८ हजार रूपये रोख व ५ ग्रॅम सोन्याचे पेंडल असा एकूण ३८ हजाराचा ऐवज चोरट्याने पळविला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## चोरीच्या संशयावरून मारहाण करणाऱ्या
# विहाळ व राजुरी येथील नागरीकांच्या विरूध्द तरूणाच्या आईची फिर्याद

करमाळा(सं.प्र.) : चोरीच्या संशयावरून २२ मे २०२३ रोजी विहाळ व राजुरी येथील नागरीकांनी कुर्डूच्या तरूणास पोलीसांच्या ताब्यात दिले होते. त्यावर पोलीसांनी गुन्हा ही दाखल केलेला आहे. यात या तरूणाच्या आईने पोलीसात विहाळ व राजुरी येथील नागरीकाच्या विरूध्द फिर्याद दिली आहे. यात फिर्यादीत त्यांनी म्हटले आहे, की माझा मुलगा, माझी मावशी संगीता पवार हिला भेटण्यासाठी आलो असता, विहाळ व राजुरी येथील नागरीकांनी त्याला बेदम मारहाण केली आहे. त्यात तो गंभीर जखमी झाला असून पोलीस त्याला घेऊन येत असतानाही दहा लोक त्याच्या पाठीमागे येत होते व त्याला मारहाण करत होते. या प्रकरणी पोलीसांनी दोन व्यक्तीच्या नावासह १३ अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## ऊसतोडीसाठी येतो म्हणून
# पैसे घेऊन फसविणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : ऊसतोडीसाठी कामावर येतो.., कामगार देतो.. असे म्हणून पैसे उचलून कामावर न येता फसवणूक करणाऱ्या सहा जणाविरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी गणेश अर्जुन जगदाळे (रा.हिसरे, ता.करमाळा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी मकाई सहकारी साखर कारखान्याकडे टोळीच्या माध्यमातून ऊस वाहतूक करतो. २७ जून २०२२ ला ऊस वाहतूक करण्यासाठी येतो म्हणून संजय सुखदेव शिंदे (रा.अहमदनगर), अनिल राजू मोरे (रा.पोथरे), गोपीनाथ बन्सी मोरे (रा.सोनारवाडी, ता.कर्जत), विजय गुलाब बरडे (रा.चापटगाव, ता.कर्जत) तसेच संतोष गोरख पवार व अक्षय गोरख पवार (दोघे रा.वीट) यांना ९ लाख रूपये रोख दिले आहेत व नोटरी केली आहे. परंतु त्यांनी नोटरी करूनही ऊसतोड मजुर दिले नाहीत व स्वत:ही आले नाहीत. त्यांनी फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# वीट येथे मटका घेणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : वीट येथे मटक्याचे आकडे घेणाऱ्या विरुध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार २९ जुलैला दुपारी साडेतीन वाजता वीट येथे घडला आहे. या प्रकरणी तौफिक रज्जाक काझी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की लहू रामकृष्ण वाघमारे रा.वीट हा वीट येथे मटक्याचे आकडे फाडताना आढळला आहे. त्याच्याकडून पांढऱ्या रंगाचे स्लीप बुक, पेन व ११५० रू. जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## किरकोळ कारणावरून
# उमरड येथे मारहाण

करमाळा (सं.प्र.) : उमरड येथे किरकोळ कारणावरून लाकडाने व कुऱ्हाडीने मारहाण करणाऱ्या तिघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार ३० जुलैला सायंकाळी साडेनऊ वाजता घडला आहे. या प्रकरणी नवनाथ किसन पवार (रा.वाळकेश्वर, ता.अंबड, जि.जालना. ह.रा.उमरड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३० जुलैला सकाळी किरकोळ वाद झाल्याच्या कारणावरून रात्री साडेनऊ वाजता संदीप वसंत जाधव, वसंत आण्णा जाधव तसेच दिलीप गायकवाड या सर्वांनी माझी पत्नी सौ.सारीका, आई सौ.निलाबाई व वडील किसन पवार यांना लाकडी दांडक्याने व कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## बागवान नगर येथे
# संशयास्पद व्यक्तीस अटक

करमाळा(सं.प्र.) : बागवान नगर, करमाळा येथे २८ जुलैच्या रात्री पावणेदहा वाजता अंधारात स्वत:चे अस्तित्व लपवून बसलेल्या व्यक्तीस पोलिसांनी पकडले आहे. यात पोलीस कॉन्स्टेबल गणेश लालासाहेब शिंदे यांनी फिर्याद दिली. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्ही शहरात पेट्रोलिंग करताना बागवान नगर भागात एक इसम अंधारात लपून बसलेला दिसला. त्यास पकडल्यावर अनिल सखाराम लष्करे (रा.नवगण राजुरी, ता.बीड) असे त्याचे नाव आहे. त्यास ताब्यात घेऊन त्याचे विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# महिलांना झालंय तरी काय..?

गेल्या आठवड्यात संसदेमध्ये केंद्रिय गृहमंत्रालयाने महिला व मुली बेपत्ता झाल्याबाबतची आकडेवारी सादर केली. या आकडेवारीत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक आहे. यानुसार मागील तीन वर्षातील १८ वर्षावरील मुली-महिलांची संख्या १ लाख ७८ हजार ४०० तर १८ वर्षाखालील मुलींची १३ हजार ३३ अशी बेपत्ता झालेल्यांची नोंद आहे.

**प्रासंगिक**

आपल्या करमाळा तालुक्याचा विचार केला तर गेल्या वर्षभरामध्ये दर आठवड्याला चार-पाच मुली-महिला बेपत्ता झालेल्यांची नोंद आहे. या महिला नेमक्या जातात कुठे..? त्यांचं पुढं होत काय ? हा खरा प्रश्न आहे. अल्पवयीन मुलींचे बेपत्ता होण्याचे प्रमाणही दखल घेण्याजोगे आहे. वरचेवर हे आकडे वाढत आहेत. यासाठी पालक, शिक्षक व समाजातील द्रष्टे लोक संस्कार करण्याचे काम करतात, परंतू सोशल मिडीयाचे हत्यार हे दुधारी असून या महिला आणि मुलींना घरातून बाहेर काढण्याचे माध्यम ठरलेले आहे. ज्या घरातील महिला अथवा मुलगी गेलेली असते, त्या घराला घरपण राहत नाही. समाजात या घरातील माणसं उजळ माथ्याने फिरू शकत नाही. घराची उन्नती होण्याऐवजी अधोगती होते. बहुतांशी ज्या व्यक्ती बेपत्ता झालेल्या आहेत, त्यांचे आयुष्यही उध्वस्त झाल्याचे पहावयास मिळते. अनेक घटना घडत आहेत. प्रेमात बोलविलेल्या प्रेयसीवर चाकूचे हल्ले करून तिला संपवले जात आहे, तिला गुलाम बनविले जात आहे, एवढेच नाहीतर जनावरासारखे तिला राबविले जाते. माणुस म्हणून तिचं जगणं संपतं. अशा अनेक घटना समोर येऊनही फालतु गोष्टीसाठी प्रेमाची झालर लावून मुली बेपत्ता होतात ही अत्यंत घातक गोष्ट आहे. अलिकडे विवाहित महिलांची प्रेमप्रकरणे उफाळून येत आहेत. जन्म दिलेल्या मुला-मुलींना वाऱ्यावर सोडून काही महिला छोट्याशा मोहासाठी आयुष्य उध्वस्त करून घेतात. ही बाब समजण्यासारखी आहे परंतु कळतं पण वळत नाही.. अशा तत्वांनी रोज महिलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले आहे. हा प्रकार थांबविण्यासाठी सर्वांनीच जोमाने प्रयत्न करण्याची गरज आहे. !

## व्हॉट्स ॲप कट्टा..!

### सुंदर वाक्ये

जन्माला आलो म्हणून आयुष्य रेटायचं की, एकच जन्म आहे म्हणून आयुष्य जगायचं, हे ज्याचं त्याने ठरवायचं. आयुष्य आईस्क्रीम सारखं आहे. टेस्ट केलं तरी वितळतं. वेस्ट केलं तरी वितळतं. म्हणून आयुष्य टेस्ट करायला शिका, वेस्ट तर ते तसंही होतच आहे.

---

काही शब्द असतातच असे की, ते नेहमीच ऐकावे असच वाटतं. काही नाती असतातच एवढी गोड की ती कधी संपूच नये असच वाटतं.. आणि काही माणसं असतातच एवढी आपली की, ती नेहमी आपलीच असावीत असच वाटतं.

---

सोनेरी पहाट : चांगल्या माणसांची संगत आणि यशस्वी व्यक्तींचे मार्गदर्शन आपल्या जीवनात निश्चितच प्रेरणादायी बदल घडवू शकते. म्हणूनच जीवनात जर चांगली माणसे भेटली तर त्यांच्याशी जरूर मैत्री करावी. कारण कधीही क्वांटीटी पेक्षा क्वालिटी खूप महत्वाची असते.

## बाईपण भारी देवा..



नात्यांची सुरेख गुंफण
मायेचे भोवती कोंदण
मातृत्वाचा अमुल्य ठेवा
बाईपण भारी देवा ॥१॥

घर नोकरी सदैव कसोटी
आई-वडिलांची आधारकाठी
आबाल वृध्दांची नित्यसेवा
बाईपण भारी देवा ॥२॥

समृध्दीचा सतत ध्यास
सौजन्याची धरते कास
सासरी भोगते जन्मच नवा
बाईपण भारी देवा ॥३॥

सण उत्सव अन् नवीन विचार
शोभते जणु गंगेची धार
कुटूंब सुखाचाच करते धावा
बाईपण भारी देवा ॥४॥

दिव्यत्वाची साक्षात प्रचिती
पराक्रम तिचा वर्णू किती
मांगल्य सृष्टीचा शोभते दुवा
बाईपण भारी देवा ॥५॥

**...सौ.मंजिरी अविनाश जोशी**
किल्ला विभाग, करमाळा. मो.९६८९६९०७१५


## न्यु. प्रविण सुपर मार्केट

- नं.१ २१८९ गहू - ३२ रू. किलो
- बाजरी नं.१ - ३२ रू. किलो
- ज्वारी भारी - ५०/६० रू. किलो
  लाह्याची ज्वारी मिळेल.

**आरोग्यासाठी गावरान कडधान्य भाव...**

- मटकी बारीक - १३० रू. किलो
- मटकी मोठी - ९० रू. किलो
- चवळी - ८० रू. किलो
- मसुर बेस्ट - ८० रू. किलो
- वटाणा - ९० रू. किलो
- बारीक गावरान मुग - १०० रू. किलो
- पाणीपुरी वटाणा - ८० रू. किलो
- काबोली हरभरा - १०० रू. किलो
- गावरान हरभरा - ६० रू. किलो

**ड्रायफ्रुट...**

- नं.१ बदाम -६५० रू. किलो
- काजु - १६० रू. पावकिलो
- अंजीर - २५० रू. पावकिलो
- पिस्ता - २५० रू. पावकिलो
- काळा मणुका - ९० रू. पावकिलो
- मणुका भारी - ६० रू. पावकिलो
- खजुर बॉक्स - १५० किलो
- पॅकींग खजुर - ७५ रू. अर्धा किलो
- भारी खजुर - १४० रू. किलो
- महावीर पापड - ११० रू. पॅकींग
- खोबरं - १५० रू. किलो
- गावरान धने - १०० रू. किलो
- पॉपकॉर्न मका - ३० रू. पावकिलो
- पाणीपुरी - २५ रू. पावकिलो
- पाणीपुरी वटाणा - २० रू. पावकिलो
- गावरान बारीक मोहरी - ९० रू.किलो
- आरोग्यासाठी नाचणी - ७० रू. किलो

**सर्व किराणा माल होलसेल भावात मिळेल व घरपोच केलाजाईल.**

संपर्क
ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318


## भोसे ग्रा.पं.च्या उपसरपंच पदी कविता वारे



करमाळा (सं.प्र.) : भोसे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी कविता हनुमंत वारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अडीच वर्षापूर्वी भोसे ग्रामपंचायतीची निवडणूक झाली. सरपंच-उपसरपंच निवडीमध्ये सदस्यांना प्रतिनिधीत्व करता यावे; यासाठी अडीच वर्षाच्या कालावधीची मर्यादा निश्चित करण्यात आलेली होती. इतरांना संधी देण्याच्या हेतूने अमृता प्रितम सुरवसे यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिलेला होता. रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी कविता हनुमंत वारे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणनू राम बडे यांनी काम पाहिले. यावेळी सरपंच डॉ.दिपक कुंडलिक सुरवसे, ग्रा.पं.सदस्या रूपाली भारत सुरवसे, अमृता प्रितम सुरवसे यांची उपस्थिती होती. अन्य तीन सदस्य अनुपस्थित होते. कविता वारे यांची निवड झाल्यानंतर माजी सरपंच वनमाला सुरवसे यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी करमाळा-माढा विधानसभा राष्ट्रवादीचे अध्यक्ष भोजराज सुरवसे, माजी मुख्याध्यापक निवृत्ती सुरवसे, दिगंबर बागल पतसंस्थेचे अध्यक्ष बबनभाऊ सुरवसे, माजी उपसरपंच जयंत वारे, कॉन्ट्रॅक्टर संजय सुरवसे, जि.प.शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष शंकर घनवट, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष श्रीधर वारे यांचेसह गौतम वारे, हनुमंत वारे, मोहनराव वारे, चक्रधर वारे, प्रा.विजय रोडगे, भरत सुरवसे, भारत सुरवसे, गोविंद सुरवसे, पप्पू सुरवसे, गणेश सुरवसे, ज्ञानदेव सुरवसे, कैलास सुरवसे उपस्थित होते.





**सा.संदेश वार्षिक वर्गणी २०० रूपये**


प्रत्येक परिवारासाठी
परिवारातील प्रत्येकासाठी
येथे आहे काही खास....
या मान्सून सेलमध्ये तुमच्या
संपूर्ण परिवारासाठी आकर्षक ऑफरमध्ये
वस्त्रं खरेदीची सुवर्णसंधी!
MONSOON
सेल
10% ते 50% पर्यंत सूट*
SALE
आकर्षक साड्या • मेन्स वेअर • लेडिज वेअर • किडस् वेअर • गृहसजावट
एल.डी. बलदोटा
मेन रोड, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर मो. : 9096586755
*अटी लागू


AK
Anandi Jewellers
देऊन उपहार खास...
साजरा करा अधिक मास....
सर्वांना 'अधिक मास'
च्या हार्दिक शुभेच्छा !
अधिक मास निमित्त
सोन्या-चांदीच्या दागिन्यांची भव्य व्हरायटी, वाजवी दर
व वाजवी मजुरी..
आनंदी ज्वेलर्स
मेनरोड, करमाळा • फोन (०२१८२)२२२२०९ मो.९४२०९१५०९९